# सायबर सुरक्षेतून टाळा फसवणूक : चर्चासत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**

**जळगाव, २३ जुलै**

ऑनलाईन फसवणूक टाळण्यासाठी सायबर सुरक्षेची माहिती घेणे आवश्यक असते. या अनुषंगाने शहरातील ए. टी. झांबरे विद्यालयात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बुधवारी (२२ जुलै) सायबर सुरक्षा जनजागृती विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. दुपारी एक ते दोन या वेळेत सत्रामध्ये प्रियांदर्शनी भांडारकर व खुशबू लांबोळे यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. यामध्ये ऑनलाइन, फसवणूक, फिशिंग, विशिंग, स्मिशिंग, ओटीपी व पासवर्ड सुरक्षितता, मजबूत पासवर्ड तयार करण्याचे महत्त्व, दोन-स्तरीय प्रमाणिकरण (२-), सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, बनावट लिंक व कोड स्कॅमपासून सावध राहणे, सायबर बुलिंग, डिजिटल गोपनीयता, अज्ञात व्यक्तींशी ऑनलाइन संपर्क टाळणे, मोबाईल अ‍ॅप्स डाउनलोड करताना घ्यावयाची सुरक्षा काळजी तसेच सायबर गुन्ह्यांपासून बचावाचे उपाय याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या चर्चासत्राला ३०० विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

संवादात्मक पद्धतीच्या या सत्राला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून सायबर सुरक्षेबाबतची माहिती जाणून घेतली तसेच सुरक्षित डिजिटल जीवनशैलीचा या अभियाना प्रसंगी संकल्प केला.या चर्चासत्रास ऐ टी झांबरे विद्यालयाच्या प्रिन्सिपल प्रणिता झांबरे, तसेच शिक्षकांचे सहकार्य लाभले.